RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2010-12

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ३, अंक ८] गुरुवार, एप्रिल २८, २०११/वैशाख ८, शके १९३३ [पृष्ठ ११४
किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक २६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार कलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ एप्रिल २०११

**अधिसूचना**

**वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९.**

क्र. वैमायं. - २०१०/८१६/प्र.क्र.१७५/ ग्रा.सं. ४.– वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९(२०१० चा १) च्या कलम ५३ च्या पोट-कलम (१), (२)आणि (३) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकरांचा वापर करून तसेच केंद्र शासनाशी पूर्वविचारविनिमय केल्यानंतर पोट-कलम (१) अन्वये या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याकरिता कलम ५३ च्या पोट-कलम (४) अन्वये पूर्वप्रसिद्ध करण्यात आलेले खालील नियम करीत आहे, ते असे :—





**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ :—**

(१) या नियमांना, महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ असे म्हणण्यात येईल.

(२) ते संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू होतील.

(३) ते दिनांक २८ एप्रिल २०११ पासून अंमलात येतील.

**२. व्याख्या :** या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) ‘‘अधिनियम’’ याचा अर्थ, वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ (२०१० चा १), असा आहे,

(ख) ‘‘नमुना’’ याचा अर्थ, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला नमुना, असा आहे,

(ग) ‘‘दुरुस्ती’’ याचा अर्थ, मूळ मुद्रांक आणि / अथवा मोहरबंदास अडथळा आणून किंवा अडथळा न आणता, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये, स्थापन केलेल्या मानकांशी अनुरूप अशी वजने किंवा मापे यांची सुनिश्चिती करण्यासाठी कोणत्याही वजन वा मापाचे समायोजन, स्वच्छता, वंगवणी किंवा रंगकाम करणे किंवा अशा वजन वा मापाच्या कोणत्याही भागांसाठी अन्य कोणतीही सेवा देणे किंवा त्यांची पुन:स्थापना करणे, असा आहे ;

(घ) ‘‘अनुसूची’’ याचा अर्थ, या नियमांना जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ङ) ‘‘पडताळणी न केलेले वजन वा माप’’ याचा अर्थ, अधिनियमान्वये पडताळणी, मुद्रांकित व मोहोरबंद करणे आवश्यक असलेले, व अशा प्रकारे पडताळणी, मुद्रांकित व मोहोरबंद न केलेले वजन वा माप, असा आहे ;

(च) या नियमात वापरलेल्या आणि व्याख्या न केलेल्या परंतु, अधिनियमात व्याख्या केलेल्या शब्दांचा व शब्दप्रयोगाचा अर्थ त्या अधिनियमात त्यांना जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच असेल.

**३. वजन वा माप यांचे प्रत्यक्ष वर्णन, आकारमान, संरचनात्मक तपशील.—**

कोणत्याही व्यवहारात किंवा संरक्षणासाठी वापरात असलेले किंवा वापरण्याचा उद्देश असलेले प्रत्येक वजन वा माप हे प्रत्यक्ष वर्णन, आकारमान, संरचनात्मक तपशील, सामग्री, कार्य (उपयुक्तता) क्षमता, ग्राह्य मर्यादा व असे अन्य तपशील याबाबतीत वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११ द्वारे विहित करण्यात आलेल्या विनिर्दिष्ट बाबींनुसार असेल.

**४. सोनेचांदी मोजण्याची वजने, कॅरेटची वजने इत्यादींचा वापर .—**

(१) मौल्यवान धातू, मोती व सोने, चांदी किंवा प्लॅटीनम यापासून बनविलेले दागिने किंवा इतर वस्तू यासह सोन्या-चांदीच्या संबंधातील कोणत्याही व्यवहारात वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११ मध्ये विहित केल्याप्रमाणे सोनेचांदी मोजण्याच्या वजनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही वजन वापरण्यात येणार नाही.

(२) मौल्यवान खड्यांच्या कोणत्याही व्यवहारात कॅरेट वजनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही वजन वापरण्यात येणार नाही.

(३) केवळ वर्ग-अ किंवा वर्ग-ब प्रवर्गाचा दांडीचा तराजू किंवा विशेष अचूकता असलेले (वर्ग-एक) किंवा उच्च अचूकता असलेला (वर्ग दोन) चे अस्वयंचलीत तोलन उपकरण यांचा पोट-नियम (१) व (२) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यवहारात वापर करण्यात येईल.

(४) नियंत्रक, कोणत्याही व्यापारात, वजन वा माप यांच्या विशिष्ट प्रकाराच्या वापराकरिता अधिसूचनेद्वारे अनुदेश किंवा निदेश अथवा आदेश काढू शकतील.

**५. विविक्षित प्रकरणांमध्ये केवळ वजनांचा किंवा केवळ मापांचा किंवा अंकाचा वापर करणे .—** अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तूंच्या बाबतीत असेल त्याव्यतिरिक्त इतर प्रत्येक व्यवहारात, व्यापारात किंवा करारात किंवा सुरक्षेकरिता त्या वस्तूंचे परिमाण —

(अ) ती वस्तू घन, अर्धवट घन, चिकट किंवा घन व द्रवरूप वस्तूंचे मिश्रण असेल त्याबाबतीत वजनाच्या परिमाणामध्ये ;

(ब) ती वस्तू रेषीय मापाने विकण्यात येत असल्यास लांबीच्या परिमाणामध्ये ;

(क) क्षेत्राच्या मापाने विकण्यात येत असल्यास क्षेत्राच्या मोजमापात ;

(ड) ती वस्तू द्रवरुप असल्यास, किंवा घनफळाच्या मोजमापात विकण्यात येत असल्यास आकारमान किंवा ;

(ई) ती वस्तू नगावर विकली जात असल्यास, अंकाच्या मोजमापात जाहीर करण्यात येईल.

**६. वजन वा माप यांचे उत्पादक, दुरुस्तक आणि विक्रेता यांना लायसन देण्याबाबत.—**

(१) वजन वा माप यांचा प्रत्येक उत्पादक किंवा दुरुस्तक किंवा त्यांचा विक्रेता आपणाला लायसन मिळावे म्हणून अनुसूची दोन - क मध्ये नमूद केलेल्या समुचित नमुन्यांत नियंत्रकाकडे किंवा याबाबतीत त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा अन्य वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याकडे अर्ज करील:

परंतु, दुरुस्तीसाठी, उत्पादकाने स्वतः निर्माण केलेल्या वजन वा मापाची दुरुस्ती करण्यासाठी त्याची निर्मिती करत असलेल्या राज्याव्यतिरिक्त इतर राज्यात दुरुस्ती करण्यासाठी उत्पादकास दुरुस्तीचे कोणतेही लायसन्स असण्याची आवश्यकता असणार नाही, तथापि, उत्पादकाने, दुरुस्तीबाबत संबंधित वैध मापन शास्त्र अधिकाऱ्यास आगाऊ कळविले पाहिजे :

परंतु, आणखी असे की, एखादी व्यक्ती मालकीच्या किंवा तिच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही वजन वा मापाची खरीखुरी दुरुस्ती करीत असेल तर त्या व्यक्तीस या पोट-नियमात नमूद केलेले लायसन घेण्याची आवश्यकता असणार नाही :

परंतु, आणखी असेही की, नियंत्रकाने विनिर्दिष्ट केलेली तांत्रिक समर्थता चाचणी उमेदवार उत्तीर्ण झाल्याशिवाय त्यास कोणतेही लायसन देण्यात येणार नाही.





(२) वजन वा माप यांचा प्रत्येक उत्पादक किंवा दुरुस्तक किंवा विक्रेता लायसनची विधिग्राह्यता समाप्त होण्याच्या किमान तीस दिवस आधी अनुसूची दोन -ख मध्ये घालून दिलेल्या समुचित नमुन्यात नियंत्रकाकडे किंवा याबाबतीत त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा अन्य अधिकाऱ्याकडे नूतनीकरणासाठी अर्ज करील :

परंतु, कोणत्याही वाजवी कारणाखेरीज, नियंत्रकाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे किमान उत्पादन / दुरुस्तीचे काम केल्याखेरीज लायसनधारकाच्या लायसनचे नूतनीकरण करण्यात येणार नाही.

(३) प्रत्येक उत्पादक, दुरुस्तक किंवा विक्रेता यांना देण्यात येणारे लायसन अनुसूची तीन मध्ये नमूद केलेल्या समुचित नमुन्यात असेल.

(४) प्रत्येक उत्पादक, दुरुस्तक किंवा विक्रेता यांना देण्यात येणारे लायसन हे एका कॅलेंडर वर्षाच्या कालावधीसाठी विधिग्राह्य असेल व अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केलेली आवश्यक फी भरल्यावर नियंत्रकाकडून किंवा याबाबतीत त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या अन्य वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याकडून आणखी एक ते पाच कॅलेंडर वर्षाच्या कालावधीकरिता त्याचे नूतनीकरण करण्यात येईल.

(५) पोट-नियम (१) व (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या लायसनकरता द्यावयाची फी अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे असेल :

परंतु, लायसनच्या विधिग्राह्यतेचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकानंतर तीन महिन्यांच्या कालावधीत लायसनच्या नूतनीकरणाकरिता अर्ज करण्यासाठी अर्जदारास नियंत्रकाने परवानगी दिल्यास त्यास अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संपूर्ण दराने दरवर्षी अतिरिक्त फी द्यावी लागेल :

परंतु, आणखी असे की, लायसन विधिग्राह्यता कालावधी समाप्त होण्याच्या दिनांकापूर्वी तीस दिवसांच्या कालावधीत, अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराच्या निम्म्या दराने अर्जदारास दरवर्षी अतिरिक्त फी द्यावी लागेल.

(६) लायसनमध्ये फेरफार करण्यासाठी किंवा लायसनची नक्कल प्रत मिळण्यासाठी देय असणारी फी ही अनुसूची पाच मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

(७) अधिनियमाखालील व या नियमांखालील लायसनप्राप्त प्रत्येक दुरुस्तक, अनुसूची सहा मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राज्य शासनाला प्रत्येक लायसनकरिता प्रतिभूति ठेव सादर करील.

(८) नियंत्रक किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला अन्य अधिकारी लायसनप्राप्त उत्पादक, विक्रेता आणि दुरुस्तक यांची नोंदवही अनुसूची सात मध्ये नमूद केलेल्या नमुन्यात ठेवील.

(९) अधिनियमान्वये आणि या नियमांन्वये प्रत्येक लायसनप्राप्त उत्पादक किंवा दुरुस्तक नियंत्रकाने विनिर्दिष्ट केलेली अशी कार्यशाळा किंवा साधनसामग्री अथवा हत्यारे इत्यादी ठेवेल.

(१०) या नियमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, कोणत्याही वजन वा मापाचा उपयोगकर्ता विक्री करत असेल ( जो तयार करणारा, उत्पादक, विक्रेता किंवा दुरुस्तक नसेल ) अशा बाबतीत लागू होणार नाही :

परंतु, विहित वर्णनाच्या कोणत्याही वजन वा मापाची विक्री, नियंत्रकाच्या किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केला असेल अशा इतर वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही.

(११) ती व्यक्ती स्वतः किंवा तिने कामावर ठेवलेली एखादी व्यक्ती ही अर्हताप्राप्त व्यक्ती नसेल तर, अशा व्यक्तीस उत्पादन करण्याचे किंवा दुरुस्ती करण्याचे लायसन देण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण** :- या नियमाच्या प्रयोजनार्थ, "अर्हताप्राप्त व्यक्ती" याचा अर्थ, जी विज्ञान शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवीधारक ( त्यातील एक विषय भौतिकशास्त्र हा असेल), अभियांत्रिकी मधील पदवीधारक, किंवा अभियांत्रिकीमधील मान्यताप्राप्त पदविका धारण करीत असेल किंवा जिने संबंधित व्यवसायामध्ये किंवा समतुल्य पाठयक्रमामध्ये आयटीआय केले असेल अशी व्यक्ती, असा आहे :

परंतु, या पोट-नियमातील कोणतीही गोष्ट या नियमांच्या प्रारंभापूर्वी वैध लायसन धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस लागू होणार नाही.

**७. उत्पादकाच्या लायसनबाबतच्या शर्ती .—**

(१) ज्याच्या नावावर उत्पादक लायसन दिले आहे अशी व्यक्ती,—

(क) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या सर्व संबंधित तरतुदींचे अनुपालन करील ;

(ख) त्या त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या कोणत्याही उल्लंघनास उत्तेजन देणार नाही किंवा ते चालवून घेणार नाही ;

(ग) अधिनियमाखाली देण्यात आलेले किंवा नूतनीकरण करण्यात आलेले लायसन, लायसनधारक लायसनमधील नमूद जागेत ठळकपणे प्रदर्शित करेल.

(घ) नियंत्रकाने दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांचे अनुपालन करील ;

(च) व्यवसाय बंद करण्याच्या प्रसंगी आणि / किंवा लायसन रद्द झाल्याच्या प्रसंगी लायसन परत करील.

(२) हे लायसन दिल्यानंतर विहित केलेली प्रत्येक शर्त, अधिसूचित केली असेल तर, ज्या व्यक्तींना लायसन देण्यात आले असतील त्या व्यक्तींवर बंधनकारक असेल.

(३) नियम ६(११) मध्ये विहित केल्याप्रमाणे उत्पादनाचे काम अर्हताप्राप्त व्यक्तीकडून करून घेण्यात येईल :



परंतु, या नियमातील कोणतीही गोष्ट या नियमांच्या प्रारंभापूर्वी वैध लायसन धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस लागू होणार नाही.

(४) संस्थेच्या घटनेतील किंवा अर्हताप्राप्त व्यक्तींबाबतचा कोणताही बदल हा, लायसन देणाऱ्या प्राधिकाऱ्यास एक महिन्याच्या आत कळवील.

(५) या अधिनियमान्वये देण्यात आलेले किंवा नूतनीकरण करण्यात आलेले लायसन हे, विक्रीयोग्य, अभिहस्तांकनीय किंवा हस्तांतरणीय असणार नाही.

**स्पष्टीकरण १ :-** लायसनधारक पुढील प्रकरणांत, या नियमाच्या अर्थांतर्गत अभिहस्तांकित केला असल्याचे किंवा पारेषित केला असल्याचे मानण्यात येणार नाही :-

(क) लायसनधारकाने संबंधित व्यवसाय चालविण्यासाठी, कोणत्याही अन्य व्यक्तीशी व्यक्तीगत भागीदारी करार केला असेल, परंतु अशा कोणत्याही बाबतीत, भागीदारी संस्थेस, अन्यथा अंमलात असेल तर, जोवर लायसनधारक हा भागीदारी संस्थेचा सदस्य असेल तोवर, लायसनचा वापर करता येईल.

(ख) लायसनधारक भागीदारी संस्था असेल व नंतर त्याने संस्थेच्या घटनेत बदल केला असेल, परंतु अशा कोणत्याही बाबतीत, पुनर्गठित संस्थेत मूळ संस्थेस लायसन घेतेवेळी असणा-या भागीदाराचा समावेश असेपर्यंतच लायसनचा वापर करता येईल.

**स्पष्टीकरण २ :-** स्पष्टीकरण १ च्या प्रयोजनार्थ, "भागीदारी संस्था" या संज्ञेचा भारतीय भागीदारी संस्था अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) याच्या कलम ४ अन्वये जो अर्थ असेल तोच अर्थ असेल.

**८. दुरुस्तकाच्या लायसनबाबतच्या शर्ती .—**

(१) ज्याच्या नावे दुरुस्तीचे लायसन देण्यात आले आहे अशी व्यक्ती,

(क) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या सर्व सबंधित तरतुदींचे अनुपालन करील ;

(ख) त्या त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या कोणत्याही उल्लंघनास उत्तेजन देणार नाही किंवा ते चालवून घेणार नाही ;

(ग) अधिनियमाखाली देण्यात आलेले किंवा नूतनीकरण करण्यात आलेले लायसन, लायसनधारक लायसनमधील नमूद जागेत ठळकपणे प्रदर्शित करेल;

(घ) नियंत्रकाने दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांचे अनुपालन करील ;

(च) व्यवसाय बंद करण्याच्या प्रसंगी आणि / किंवा लायसन रद्द झाल्याच्या प्रसंगी लायसन परत करील.

(छ) (एक) यथोचितरित्या दुरुस्त केलेले वजन वा माप संबंधित उपयोगकर्त्यास परत करण्यापूर्वी नियम १३ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे वैध मापन शास्त्र अधिका-याकडे पडताळणी, मुद्रांकन आणि मोहरबंद करण्यासाठी सादर करेल.

(दोन) फेरपडताळणीच्या नियत दिनांकापूर्वी वजन वा मापाची दुरुस्ती केल्यास असे वजन वा माप सबंधित उपयोगकर्त्यास परत करण्यापूर्वी वैध मापन शास्त्र अधिका-याकडे पडताळणी, मुद्रांकन आणि मोहरबंद करण्यासाठी सादर करेल.

(२) हे लायसन दिल्यानंतर विहित केलेली प्रत्येक शर्त, अधिसूचित केली असेल तर, ज्या व्यक्तींना लायसन देण्यात आले असतील त्या व्यक्तींवर बंधनकारक असेल.

(३) नियम ६(११) मध्ये विहित केल्याप्रमाणे दुरुस्तीचे काम अर्हताप्राप्त व्यक्तीकडून करून घेण्यात येईल :

परंतु, या नियमातील कोणतीही गोष्ट या नियमांच्या प्रारंभापूर्वी वैध लायसन धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस लागू होणार नाही.

(४) संस्थेच्या घटनेतील किंवा अर्हताप्राप्त व्यक्तींबाबतचा कोणताही बदल हा, लायसन देणाऱ्या प्राधिकाऱ्यास एक महिन्याच्या आत कळवील.

(५) या अधिनियमान्वये देण्यात आलेले किंवा नूतनीकरण करण्यात आलेले लायसन हे, विक्रीयोग्य, अभिहस्तांकनीय किंवा हस्तांतरणीय असणार नाही.

**स्पष्टीकरण १ :-** लायसनधारक पुढील प्रकरणांत, या नियमाच्या अर्थांतर्गत अभिहस्तांकित केला असल्याचे किंवा पारेषित केला असल्याचे मानण्यात येणार नाही :-

(क) लायसनधारकाने संबंधित व्यवसाय चालविण्यासाठी, कोणत्याही अन्य व्यक्तीशी व्यक्तिगत भागीदारी करार केला असेल, परंतु अशा कोणत्याही बाबतीत, भागीदारी संस्थेस, अन्यथा अंमलात असेल तर, जोवर लायसनधारक हा भागीदारी संस्थेचा सदस्य असेल तोवर, लायसनचा वापर करता येईल.

(ख) लायसनधारक भागीदारी संस्था असेल व नंतर त्याने संस्थेच्या घटनेत बदल केला असेल, परंतु अशा कोणत्याही बाबतीत, पुनर्गठित संस्थेत मूळ संस्थेस लायसन घेतेवेळी असणा-या भागीदाराचा समावेश असेपर्यंतच लायसनचा वापर करता येईल.

**स्पष्टीकरण २ :-** स्पष्टीकरण १ च्या प्रयोजनार्थ, "भागीदारी संस्था" या संज्ञेचा भारतीय भागीदारी संस्था अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) याच्या कलम ४ अन्वये जो अर्थ असेल तोच अर्थ असेल.

(६) नियंत्रकास, आवश्यक वाटेल अशा वजन वा माप यांच्या दुरुस्तीकरिता कमाल दुरुस्ती आकाराची निश्चिती करण्यासाठी आवश्यक वाटेल अशा ठिकाणी व अशा रीतीने हाती घ्यावयाच्या समन्वय कार्यक्रमाची आखणी करता येईल. दुरुस्तक अशा कमाल दुरुस्ती आकारास बांधील राहील.



**९. विक्रेता लायसनबाबतच्या शर्ती :-**

(१) ज्याच्या नावे विक्री लायसन देण्यात आले आहे अशी व्यक्ती :-

(क) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या सर्व संबंधित तरतुदीचे अनुपालन करील ;

(ख) त्या त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या कोणत्याही उल्लंघनास उत्तेजन देणार नाही किंवा ते चालवून घेणार नाही ;

(ग) अधिनियमाखाली आणि यानियमांन्वये देण्यात आलेले किंवा नूतनीकरण करण्यात आलेले लायसन, सबंधित लायसनधारकाच्या लायसनमधील नमूद जागेत ठळकपणे प्रदर्शित करेल.

(घ) नियंत्रकाने दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांचे अनुपालन करील ;

(च) व्यवसाय बंद करण्याच्या प्रसंगी आणि / किंवा लायसन रद्द झाल्याच्या प्रसंगी लायसन परत करील.

(छ) अप्रमाणित वजन वा मापाची विक्री, ते देऊ करणे, त्यांचे विक्रीसाठी प्रदर्शनव ती बाळगणार नाही.

(२) हे लायसन दिल्यानंतर विहित केलेली प्रत्येक शर्त, अधिसूचित केली असेल तर, ज्या व्यक्तींना लायसन देण्यात आले असतील त्या व्यक्तींवर बंधनकारक असेल.

(३) संस्थेच्या घटनेतील कोणताही बदल हा, लायसन देणाऱ्या प्राधिकाऱ्यास एक महिन्याच्या आत कळवील.

(४) या अधिनियमान्वये देण्यात आलेले किंवा नूतनीकरण करण्यात आलेले लायसन हे, विक्रीयोग्य, अभिहस्तांकनीय किंवा हस्तांतरणीय असणार नाही.

**स्पष्टीकरण १ :-** लायसनधारक पुढील प्रकरणांत, या नियमाच्या अर्थांतर्गत अभिहस्तांकित केला असल्याचे किंवा पारेषित केला असल्याचे मानण्यात येणार नाही :-

(क) लायसनधारकाने संबंधित व्यवसाय चालविण्यासाठी, कोणत्याही अन्य व्यक्तीशी व्यक्तिगत भागीदारी करार केला असेल, परंतु अशा कोणत्याही बाबतीत, भागीदारी संस्थेस, अन्यथा अंमलात असेल तर, जोवर लायसनधारक हा भागीदारी संस्थेचा सदस्य असेल तोवर, लायसनचा वापर करता येईल.

(ख) लायसनधारक भागीदारी संस्था असेल व नंतर त्याने संस्थेच्या घटनेत बदल केला असेल, परंतु अशा कोणत्याही बाबतीत, पुनर्गठित संस्थेत मूळ संस्थेस लायसन घेतेवेळी असणाऱ्या भागीदाराचा समावेश असेपर्यंतच लायसनचा वापर करता येईल.

**स्पष्टीकरण २ :-** स्पष्टीकरण १ च्या प्रयोजनार्थ, "भागीदारी संस्था" या संज्ञेचा भारतीय भागीदारी संस्था अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) याच्या कलम ४ अन्वये जो अर्थ असेल तोच अर्थ असेल.

**१०. लायसनचे निलंबन आणि रद्द करणे :-**

(१) नियंत्रक किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला असा इतर कोणताही वैध मापन शास्त्र अधिकारी, लायसन धारकास अधिनियमान्वये दिलेले, नूतनीकरण केलेले किंवा चालू असलेल्या लायसनबाबत ते कोणत्याही बाबतीत चुकीचे किंवा खोटे आहे असे निवेदन देऊन नवीन लायसन

देण्याबाबात, त्याचे नूतनीकरण करण्याबाबत किंवा ते चालू ठेवण्याबाबत अर्ज केला असेल किंवा लायसनधारकाने कोणत्याही शर्तीची पूर्तता करण्यात कसूर केली किंवा अधिनियमाच्या अथवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले असे समजण्यास वाजवी कारण असेल तर तो, अशा लायसनधारकाची प्रलंबित चौकशी पूर्ण होईपर्यंत त्याचे लायसन निलंबित करील :

परंतु, अशा लायसनधारकास, प्रस्तावित कार्यवाहीबाबत कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असे कोणतेही लायसन निलंबित करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, या पोट नियमात निर्दिष्ट केलेली चौकशी, अशा लायसनचे निलंबन केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत पूर्ण झाली नाही तर उपरोक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर, असे निलंबन विलोपित होईल.

(२) नियंत्रक किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला असा इतर कोणताही वैध मापन शास्त्र अधिकारी, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर लायसनधारकाने पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे खोटे किंवा चुकीचे निवेदन केले आहे, किंवा लायसनच्या कोणत्याही शर्तींची पूर्तता करण्यात लायसनधारकाने कसूर केली आहे किंवा अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल किंवा उक्त पोटनियमाखाली दिलेल्या आदेशाचे पालन केले नसल्याई त्याची खात्री पटली तर, असे लायसन रद्द करील :

परंतु अशा लायसनधारकास, प्रस्तावित कार्यवाहीबाबत कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असे कोणतेही लायसन रद्द करण्यात येणार नाही.

(३) अशा प्रकारे ज्याच्या लायसनचे निलंबन करण्यात आले असेल अशी प्रत्येक व्यक्ती, असा लायसनधारक म्हणून काम करण्याचे थांबवील आणि अशा निलंबनाचे आदेश विलोपित होईपर्यंत किंवा असे विलोपन लागू असेपर्यंत, असा लायसनधारक म्हणून व्यवसाय चालू करु शकणार नाही.

(४) ज्याचे लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात आले असेल असा प्रत्येक लायसनधारक असे निलंबन किंवा यथास्थिति रद्द करण्यात आल्यानंतर ज्याने असे लायसन दिले असेल, त्या प्राधिकाऱ्याकडे असे लायसन परत करील.

(५) ज्याचे लायसन रद्द करण्यात आले असेल असा प्रत्येक लायसनधारक, असे लायसन रद्द झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा नियंत्रकाने अथवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याने अशा दिनांकापासून तीन महिन्याहून अधिक नसेल अशा आणखी कालावधीत वाजवी कारणे दिल्यानंतर, असे लायसन रद्द झाल्याच्या दिनांकास त्याच्या ताब्यात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असलेली वजने वा मापे निकालात काढण्याची मुभा देईल आणि असे करण्यात कसूर केल्यास नियंत्रक किंवा त्याने याबाबतीत लेखी आदेशाद्वारे प्राधिकृत केलेला इतर कोणताही वैध मापन शास्त्र अधिकारी अशी वजने व मापे जप्त करून निकालात काढील आणि त्याबाबतची कार्यवाही या नियमांद्वारे विहित केली असेल अशा रितीने वितरित करील.



**११. उत्पादकांनी अभिलेख ठेवणे, इत्यादी :-** या अधिनियमान्वये व या नियमान्वये लायसन देण्यात आलेल्या वजन वा माप यांचा प्रत्येक उत्पादक किंवा दुरुस्तक किंवा विक्रेता अनुसूची आठमध्ये दिलेल्या योग्य त्या नमुन्यात नोंदवही ठेवील आणि विनिर्दिष्ट केले असतील असे नियतकालिक अहवाल किंवा विवरणपत्र सादर करील.

**१२. वजन वा मापाची नियतकालिक अंतराने पडताळणी -** वजन वा मापाची नियतकालिक फेरपडताळणी वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११ मध्ये विहीत केलेल्या कालांतराने करण्यात येईल.

**१३. वजन वा माप यांची पडताळणी आणि तपासणी :-**

(१) कोणत्याही व्यवहारात किंवा सुरक्षेकरिता, कोणतेही वजन वा माप याचा वापर करणारी प्रत्येक व्यक्ती असे वजन किंवा माप वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याच्या कार्यालायात किंवा याबाबतीत तो विनिर्दिष्ट करील अशा अन्य ठिकाणी पडताळणी ज्या तारखेस करावयाची असेल त्या तारखेस किंवा त्या तारखेच्यापूर्वी, त्याची पडताळणी करण्यासाठी किंवा फेरपडताळणी करण्यासाठी सादर करेल :

परंतु, जेव्हा कोणतेही वजन वा माप हे ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणाहून हलविता येत नसेल किंवा हलविण्यात येऊ नये अशा प्रकारचे असेल तर अशा वजन वा मापाचा वापर करणारी व्यक्ती ज्या तारखेस पडताळणी करावयाची असेल ती तारीख किमान ३० दिवस आधी वैध मापन शास्त्र अधिकाऱ्यास कळवील.

(२) जेव्हा कोणतेही वजन वा माप ते ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणाहून हलविता येत नसेल किंवा हलविण्यात येऊ नये अशा प्रकारचे असेल तेव्हा वैध मापन शास्त्र अधिकारी ज्या ठिकाणी ते असेल त्या ठिकाणी जाऊन अशा वजन वा मापाची पडताळणी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करील.

(३) वरील पोटनियमामध्ये निर्दिष्ट केलेल्या वजन वा मापांच्या पडताळणीसाठी त्याचा उपयोगकर्ता नियंत्रक विनिर्दिष्ट करील अशा सुविधा पुरवील.

(४) पडताळणीकरिता सादर केलेले प्रत्येक वजन वा माप परिपूर्ण असेल.

स्पष्टीकरण :- या नियमाच्या प्रयोजनासाठी परिपूर्ण याचा अर्थ वजन वा मापाच्या बाबतीत पडताळणीसाठी सर्व बाबतीत योग्य असा आहे.

(५) प्रत्येक वजन वा माप यांची स्वच्छ स्थितीत पडताळणी करण्यात येईल आणि आवश्यक असल्यास वैधमापनशास्त्र अधिकारी मालकास किंवा उपयोगकर्त्यास या प्रयोजनार्थ आवश्यक ती व्यवस्था करण्यास भाग पाडील.

(६) जेव्हा एखादे वजन वा माप पडताळणी करिता वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल तेव्हा तो विहित फी वसूल केल्यानंतर त्याची पडताळणी करेल.

(७) वैध मापन शास्त्र अधिकारी कोणत्याही व्यवहारात किंवा सुरक्षेसाठी वापरण्यात येत असेल किंवा वापरण्याचा उद्देश असेल किंवा वापरले जाण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही वजन वा मापाची तपासणी करण्यासाठी आणि चाचणी करण्यासाठी त्याच्या अधिकार क्षेत्रातील स्थानिक मर्यादेत असणाऱ्या प्रत्येक जागेला नियम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत शक्य असेल तितक्या वेळा वारंवार भेट देईल.

(८) वैध मापन शास्त्र अधिकारी तपासणीच्या वेळी वजन वा मापावरील मुद्रांक ठसा खालील परिस्थितीमध्ये मिटवेल-

(क) कोणतेही वजन वा माप फ़ेरपडताळणी करण्यासाठी सादर करणे आवश्यक असताना तसे केले नाही.

(ख) अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये घटित केलेल्या मानकांची पूर्तता करीत नसेल असे कोणतेही वजन वा माप.

(ग) शेवटची पडताळणी, मुद्रांकन आणि मोहोरबंद केल्यानंतर कोणतेही वजन वा माप यात दुरूस्ती करण्यात आली असेल किंवा पुनः समायोजन केले असेल.

(घ) कोणतेही वजन वा माप तुटल्यामुळे, तुटण्याचा संभव असल्याने किंवा अन्यथा सदोष असल्याने त्यामध्ये योग्य ते समायोजन शक्य नसल्यास :

परंतु, अशा वजन वा मापातील दोष अथवा त्रुटी अशी नाही की त्यावरील शिक्का ताबडतोब मिटविणे आवश्यक आहे असे वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याचे मत असेल तर तो अशा वजन वा मापाच्या उपयोगकर्त्यास अनुसूची १० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात नोटीस देईल आणि नोटीशीत विनिर्दिष्ट केल्यानुसार सात दिवसांच्या आत असा दोष, किंवा त्रुटी काढून टाकण्यासाठी बजावेल आणि,-

(एक) उपयोगकर्त्याने त्या कालावधीत दोष किंवा त्रुटी काढून टाकण्यात कसूर केली तर, शिक्का मिटवेल किंवा

(दोन) असा दोष किंवा त्रुटी अशा प्रकारे काढून टाकील आहे की ते वजन वा माप अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली स्थापन केलेल्या मानकांची पूर्तता करीत असल्यास असे वजन वा माप पडताळणी, मुद्रांकीत आणि मोहोरबंद करेल.

स्पष्टीकरण :- कोणत्याही वजन वा मापाचा शिक्का मिटविल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीनुसार वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याचे असे वजन किंवा माप जप्त करण्याचे अधिकार काढून घेतले जाणार नाहीत किंवा त्यांचा संक्षेप होणार नाही.

**१४. वजन वा माप मुद्रांकन करणे व मोहोर लावणेः-**

(१) पडताळणी केल्यानंतर प्रत्येक वजन वा माप हे अधिनियमाद्वारे आणि तदन्वये निश्चित



करण्यात आलेल्या मानकांशी अनुरूप आहे अशी वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, नियंत्रकाने वाटप केलेल्या एकरूप संकल्प चित्राच्या शिक्क्याने तो मुद्रांकन व मोहोरबंद करील, त्या शिक्क्यावर ज्याने मुद्रांकन केले असेल व मोहोर लावली असेल त्या वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याला प्रशासकीय प्रयोजनाकरिता वाटप केलेला क्रमांक दर्शविण्यात आलेला असेल :—

परंतु, जर कोणत्याही वजनाच्या वा मापाच्या स्वरूपामुळे किंवा आकारामुळे त्यावर मुद्रांकन करणे किंवा त्यास मोहोरबंद करणे इष्ट किंवा व्यवहार्य नसेल तर वैध मापन शास्त्र अधिकारी नियंत्रकांकडून सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे दिलेल्या लेखी निर्देशानुसार कार्यवाही करेल.

(२) तसेच वैध मापन शास्त्र अधिकारी वजनाच्या वा मापाच्या आकारामुळे किंवा स्वरूपामुळे ज्या बाबतीत ते व्यवहार्य ठरत नसेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत पडताळणी केलेल्या प्रत्येक वजन वा मापावर ज्या वर्षात आणि वर्षाच्या ज्या तिमाही कालावधीत त्यावर मुद्रांकन केले असेल ते वर्ष व त्याचा तिमाही कालावधी सुद्धा चिन्हांकित करील.

स्पष्टीकरण :- प्रत्येक वर्षामध्ये चार तिमाही कालावधीचा समावेश असल्याचे मानण्यात येईल व त्यापैकी पहिला तिमाही कालावधी हा जानेवारी, फेब्रुवारी व मार्च या महिन्याचा असेल आणि त्याला A असे चिन्हांकित करण्यात येईल. दुसरा तिमाही कालावधी हा एप्रिल, मे आणि जून या महिन्याचा असेल त्याला B असे चिन्हांकित करण्यात येईल तिसरा तिमाही कालावधी हा जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्याचा असेल त्याला C असे चिन्हांकित करण्यात येईल आणि चौथा तिमाही कालावधी हा ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर या महिन्याचा असेल त्याला D असे चिन्हांकित करण्यात येईल.

(३) पडताळणी, मुद्रांकनाचे व मोहोर लावण्याचे काम पूर्ण झाल्यावर वैध मापन शास्त्र अधिकारी अनुसूची ९ मध्ये दिलेल्या नमुन्यातील पडताळणी प्रमाणपत्र ज्याने असे वजन वा माप सादर केले असेल त्या व्यक्तीला देईल आणि वजन वा माप रद्द केल्याच्या प्रकरणी त्याच नमुन्यात एक स्वतंत्र प्रमाणपत्र जारी करण्यात येईल आणि प्रत्येक वजन वा माप रद्द करण्याची कारणे अनुसूची १० मध्ये दिलेल्या नमुन्यात नमूद करण्यात येतील आणि ज्याने असे वजन वा माप सादर केले असेल त्या व्यक्तीला देण्यात येईल.

(४) पडताळणी प्रमाणपत्र हरवले किंवा नष्ट झाले असेल तर पडताळणी प्रमाणपत्रधारक, ज्याने प्रमाणपत्र दिले होते त्या वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याकडे पडताळणी प्रमाणपत्राची नक्कल प्रत देण्यासाठी तात्काळ अर्ज करील. अशा प्रत्येक अर्जाबरोबर रू.२० इतरी फी द्यावी लागेल.

(५) पोटनियम (४) अन्वये असा अर्ज मिळाल्यानंतर वैध मापन शास्त्र अधिकारी अर्जदाराला ‘‘नक्कल प्रत’’ असे चिन्हांकित केलेली पडताळणी प्रमाणपत्राची नक्कल प्रत देईल.

**१५. पडताळणी फी :-**

(१) वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याच्या कार्यालयात किंवा शिबीर कार्यालयात वजन वा माप यांची पडताळणी, मुद्रांकन आणि मोहोर लावण्यासाठी देय असलेली फी अनुसूची ११ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल :

परंतु, वजन वा माप उपयोगकर्त्याच्या विनंतीवरून नियंत्रक विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात कॅलीब्रेशन प्रमाणपत्र या नियमातील अनुसूची ११ मध्ये विहीत केलेल्या फीच्या २० पट फी आकारून देण्यात येईल. असे कॅलीब्रेशन समुचित दुय्यम मानकाशी करण्यात येईल.

(२) वजन वा माप उपयोगकर्त्याच्या विनंतीवरून वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याचे कार्यालय किंवा शिबिर कार्यालय या व्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी पडताळणी केली असेल तर अनुसूची ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराच्या अर्ध्या दराने अतिरिक्त फी आकारण्यात येईल आणि वजन वा माप यांचा उपयोगकर्ता किमान रुपये १०० या मर्यादेच्या अधीन राहून कार्यकारी मानक व इतर साधनसामुग्री यांची वाहतूक करण्याच्या व ती हाताळण्याच्या खर्चासह त्या जागेला भेट देण्यासाठी वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याने केलेल्या खर्चाची रक्कम देईल :

परंतु, वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याच्या कार्यालयात किंवा शिबिर कार्यालयात पडताळणीसाठी सादर करावयाच्या वजन वा मापाची त्याच्या जागेवर पडताळणी करावयाची असल्यास अशा वजन वा मापाचा उपयोगकर्ता याबाबतची आगाऊ सूचना वैधमापनशास्त्र अधिकाऱ्यास ३० दिवस आधी देईल.

परंतु, आणखी असे की, पडताळणी, मुद्रांकन आणि मोहोर लावण्यासाठी खालील बाबतीत अतिरिक्त फी आकारली जाणार नाही :—

(एक) पेट्रोलियम उत्पादनांसाठी आणि इतर द्रवरूप पदार्थासाठी वाहन टाक्या, पाण्याखेरीज इतर द्रव पदार्थांसाठीचे मीटर (इंधन वितरक, द्रवरूप पेट्रोलियम वायू, दूध वितरक), कॉम्प्रेसड नॅचरल गॅस वितरक, वाहन काट्यासारखी अस्वयंचलित तोलन उपकरणे, स्वयंचलित ग्रॅव्हीमेट्रीक फिलिंग उपकरणे, स्वयंचलित रेल्वे वाहनकाटा, डिसकंटिन्यूअस टोटलायसिंग स्वयंचलित तोलन उपकरणे आणि जी त्यांच्या ठिकाणापासून हलविणे शक्य नसते वा हलवू नये असे इतर वजन वा माप.

(दोन) वजन वा माप यांचे उत्पादक किंवा विक्रेता यांचे ठिकाणी असलेले वजन वा माप.

(३) शिक्क्याची विधीग्राह्यता संपल्यानंतर वजन वा माप फेरपडताळणीसाठी वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याकडे सादर करण्यात आल्यास वर्षाच्या प्रत्येक तिमाहीसाठी किंवा त्याच्या भागासाठी अनुसूची ११ विनिर्दिष्ट केलेल्या दराच्या अर्ध्या दराने जादा फी देय असेल :

परंतु, पडताळणी मुद्रांक ज्या तिमाहीमध्ये वैध असेल अशा तिमाहीच्या भागासाठी अतिरिक्त फी आकारली जाणार नाही :

परंतु, आणखी असे की, वजन वा मापाचा उपयोगकर्ता ज्या वजन वा मापाचा उपयोग करणार नसल्याबाबतची लेखी सूचना नियंत्रकाने निर्दिष्ट केलेल्या नमुन्यात देईल अशा बाबतीत अतिरिक्त फी आकारली जाणार नाही.



(४) उत्पादकाकडील किंवा विक्रेत्याकडील साठ्यात असलेल्या कोणत्याही वजन वा मापावर, त्यापूर्वी मुद्रांकन करण्यात आणि मोहोर लावण्यात आली असेल त्या तारखेपासून नियम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत फेरमुद्रांकन आणि मोहोर लावण्यासाठी संपूर्ण फी देय राहील मात्र अशा वजन वा मापावरील मूळ मुद्रांक मिटविलेला नसेल.

(५) पडताळणी करण्यात आल्यानंतर चुकीचे असल्याचे आढळून आलेले वजन वा माप रद्द करण्यात येईल व आणि अनुयोजन करण्यासाठी संबंधित व्यक्तीकडे परत देण्यात येईल व अनुसूची १० मध्ये दिलेल्या नमुन्यात प्रत्येक वजन वा माप रद्द करण्याची कारणे कळविण्यात येतील आणि सात दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीत ते दोष दूर करण्याबाबत त्याला सांगण्यात येईल. आवश्यक ते अनुयोजन करण्यात आल्यानंतर व अनुसूची अकरामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या फीच्या अर्धी फी भरण्यात आल्यानंतर अशा वजन वा मापाची पडताळणी करण्यात येईल व ते अचूक असल्याचे आढळल्यास त्यावर मुद्रांकन करण्यात येईल व मोहोर लावण्यात येईल. असे करण्यास कसूर केल्यास संपूर्ण फी आकारण्यात येईल.

**१६. फी वसूल करणे व कोषागारात जमा करणे :-**

(१) पडताळणी करण्याचे काम सुरू करण्यापूर्वी वैधमापनशास्त्र अधिकारी संबधित व्यक्तीला या नियमान्वये किती फी द्यावी लागेल ते कळवील आणि नियंत्रक विनिर्दिष्ट करील अशा रीतीने ती स्वीकारून नियंत्रकाने मान्य केलेल्या नमुन्यात एक पावती देईल. अशा पावतीची एक प्रत अभिलेखात ठेवण्यात येईल :

परंतु, केंद्र किंवा राज्य शासनाच्या विभागाकडून या नियमान्वये देय असलेली फी नियंत्रकाकडून निर्देशित करण्यात येईल त्या पद्धतीने वसूल करता येईल.

(२) वैधमापनशास्त्र अधिकारी नियंत्रकाने मान्य केलेल्या नमुन्यात एक नोंदवही ठेवील व ती दररोज लिहिण्यात येईल आणि त्यामध्ये दररोज वसूल केलेली फी व इतर आकार दर्शविण्यात येईल.

(३) वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याने सप्ताहामध्ये वसूल केलेली सर्व रक्कम, नियंत्रकाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या तारखांना किंवा त्या दिवशी योग्य लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरण्यात येईल आणि तिची पावती मिळविण्यात येईल व नियंत्रकाला किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर अधिकाऱ्याला त्याबाबतीत कळविण्यात येईल.

**१७. जप्त केलेली वजने मापे इत्यादींची विल्हेवाट लावणे :-**

(१) ज्यांच्या बाबतीत न्यायालयात कार्यवाही करण्यात येणार नसेल असे, अधिनियमाच्या कलम १५ अन्वये जप्त केलेले व ताब्यात ठेवलेले कोणतेही वजन वा माप किंवा दस्तऐवज अथवा वस्तू किंवा माल यांच्या बाबतीत ती जप्त केल्याच्या तारखेपासून १८० दिवस झाल्यानंतर, नियंत्रक सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्देश देईल त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल आणि त्यांच्या सामग्रीची विक्री करण्यात येईल व उत्पन्न शासनाकडे जमा करण्यात येईल :

परंतु, नियंत्रकाला, पडताळणी न केलेले वजन वा माप, असे वजन वा माप ज्या व्यक्तीकडून कलम १५ अन्वये जप्त करण्यात आले होते. त्या व्यक्तीने ते परत करण्यात आल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत किंवा अशा वाढवून दिलेल्या मुदतीत त्याची पडताळणी करून घेतली व त्यावर मुद्रांकन करून घेतले आणि त्यावर मोहोर लावून घेतली तर शिक्क्यांची विधिग्राह्यता समाप्त झाल्यानंतर पुन्हा पडताळणी करण्यात येण्यासाठी देय असलेल्या जादा फीसह विहित करण्यात आलेली फी भरण्याची हमी दिल्यावर परत करता येईल असा निदेश देता येईल.

(२) अधिनियमाचे कलम १५ अन्वये जप्त व निरुद्ध करण्यात आलेले आणि ज्यांच्या बाबतीत न्यायालयात कार्यवाही करण्यात येणार असेल असे कोणतेही वजन वा माप किंवा दस्तऐवज अथवा वस्तू किंवा माल वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याकडून न्यायालयात सादर करण्यात येईल, आणि कार्यवाही समाप्त झाल्यानंतर वैधमापनशास्त्र अधिकारी ती ताब्यात घेईल व न्यायालयीन कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार तिच्या बाबतीत कार्यवाही करील :

परंतु, न्यायालयाकडून आदेश मिळाले नाहीत तर, नियंत्रकाकडून विशेष आदेशाद्वारे निर्देश देण्यात येईल त्यानुसार असे वजन वा माप, दस्तऐवज अथवा वस्तू किंवा माल याबाबत कार्यवाही करण्यात येईल व त्या सामग्रीची विक्री करण्यात येऊन उत्पन्न शासनाकडे जमा करण्यात येईल.

(३) अधिनियमाच्या कलम १५ अन्वये जप्त करण्यात आलेला माल लवकर किंवा नैसर्गिकरित्या सडून जाणार असेल तर नियंत्रक किंवा अन्य वैधमापनशास्त्र अधिकारी त्यांच्याजवळ असलेल्या किंवा अपराधाच्या ठिकाणाजवळ उपलब्ध असलेल्या पडताळणी केलेल्या तोलन वा मापन उपकरणाच्या साधनावर त्या मालाचे वजन करील किंवा त्याची मोजणी करील आणि अनुसूची १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात मालाच्या प्रत्यक्ष वजनाची किंवा मोजमापाची नोंद करील आणि त्यावर व्यापाऱ्याची किंवा त्यांच्या प्रतिनिधीची किंवा ज्याने अपराध केलेला असेल अशा इतर व्यक्तीची सही घेईल. अशा प्रकारे वजन किंवा मोजणी केल्यावर संबंधित माल यथास्थिती विक्रेता किंवा खरेदीदार यांना परत करण्यात येईल :

परंतु, व्यापारी किंवा त्यांचा प्रतिनिधी किंवा इतर व्यक्ती (जिने अपराध केला असेल) त्यांनी नमुन्यावर सही करण्यास नकार दिला तर नियंत्रक किंवा अन्य वैधमापनशास्त्र अधिकारी असा नकार दिल्याच्या वेळीस हजर असलेल्या दोन पेक्षा कमी नसतील एवढया व्यक्तीची त्यावर सही घेईल :

परंतु, आणखी असे की, जप्त व निरुद्ध केलेला माल लवकर किंवा नैसर्गिकरित्या सडणारा असेल असे ठरविण्याबाबत नियंत्रक, अंतिम प्राधिकारी असेल.

(४) अधिनियमाच्या कलम १५(१) अन्वये जप्त करण्यात आलेल्या मालामध्ये आवेष्टित वस्तुचा समावेश असेल आणि आवेष्टित वस्तू फसवी असेल किंवा अधिनियम किंवा त्या खाली केलेले



नियम यांच्या तरतुदीनुरूप नसेल अशी आवेष्टीत वस्तू लवकर किंवा नैसर्गिकरित्या सडणारी असेल, त्याबाबतीत वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याला शक्य असेल तेथवर पोट-नियम (३) च्या तरतुदीअन्वये अशा आवेष्टित वस्तुंची विल्हेवाट लावता येईल.

(५) कलम १५ अन्वये जप्त केलेला माल जलद किंवा नैसर्गिकरित्या सडणारा नसेल तर नियंत्रक किंवा अन्य वैधमापनशास्त्र अधिकारी व्यापाऱ्यास किंवा त्याच्या प्रतिनिधीस किंवा अन्य इसमास (ज्याने हा अपराध केलेला आहे) अशी जप्तीची नोटीस दिल्यानंतर या अधिनियमान्वये खटला भरण्याच्या प्रयोजनासाठी ती आवेष्टित वस्तू स्वतःकडे ठेऊन घेऊ शकेल.

**१८. यथोचितरित्या मुद्रांक किंवा मोहोर केलेल्या वजन वा मापाची विधिग्राह्यता:-**

(१) या नियमान्वये यथोचितरित्या पडताळणी केलेले किंवा करण्यात आल्याचे मान्यता असलेले वजन वा माप हे राज्यातील ज्या ठिकाणी मुद्रांकन व मोहोर करण्यात आलेले आहेत अशा राज्यातील प्रत्येक ठिकाणी जोपर्यंत तपासणी किंवा पडताळणी नंतर अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्थापित मानकांशी असे वजन वा माप हे अभिसंगत असणे समाप्त होईल तोपर्यंत अधिनियमान्वये स्थापित झालेल्या मानकांशी अभिसंगत असल्याचे मानण्यात येईल.

(२) या नियमान्वये येथोचितरित्या पडताळणी, मुद्रांकन आणि मोहोरबंद करण्यात आलेल्या किंवा करण्यात आल्याचे मानण्यात आलेल्या कोणत्याही वजन वा मापाचे ते ज्या मूळ ठिकाणी पडताळणी, मुद्रांकन आणि मोहोर करण्यात आले त्या ठिकाणाव्यतिरिक्त राज्यातील अन्य ठिकाणी वापरण्यात आले या गोष्टीमुळे त्याचे पूनर्मुद्रांकन आणि फेरमोहोर करण्याची आवश्यकता असणार नाही :

परंतु, एका ठिकाणी उभारण्यात आलेले पडताळणी केलेले वजन वा माप हे भाग सुटे करून ते वेगळ्या ठिकाणी पुन्हा उभारण्यात आले तर अशा वजन वा मापाची नियतकालिक फेर-पडताळणीस पात्र नसले तरीही जोपर्यंत त्याची यथोचितरित्या फेरपडताळणी, मुद्रांकन आणि मोहोरबंद करण्यात येत नाही तोपर्यन्त, असे वजन वा माप उपयोगात आणता येणार नाही.

(३) जेथे पडताळणी करण्यात आलेले वजन वा माप याची लायसनधारक दुरुस्तकाकडून किंवा त्याच्या मालकी असणाऱ्या व ते धारण करणाऱ्या व्यक्तीकडून, दुरुस्ती करण्यात आली तरी तेथे, अशा वजन वा मापाची ते नियतकालिक फेरपडताळणीसाठी पात्र नसले तरीही जोपर्यंत त्याची यथोचितरित्या फेरपडताळणी, मुद्रांकन आणि मोहोरबंद करण्यात येत नाही तोपर्यन्त, असे वजन वा माप उपयोगात आणता येणार नाही.

**१९. वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याची अर्हता -** वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याची अर्हता वैधमापनशास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११ च्या नियम २८ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

**२०. वैधमापनशास्त्र अधिकाऱ्यासाठी कार्यकारी किंवा दुय्यम मानके, साधनसामुग्री इत्यादींचा पुरवठा करण्याची तरतूद :—**

(१) प्रत्येक वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याला कार्यकारी मानक किंवा द्वितीय मानक वजने, कार्यकारी किंवा द्वितीय मानक काटे आणि नियंत्रकांकडून वेळोवेळी मंजूर करण्यात आलेली अशी उपकरणे ज्यामध्ये तोलन व मापन साधनाचा अंतर्भाव असेल अशी इतर साधने देण्यात येतील.

(२) प्रत्येक वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याला साचे, ठसे, कागदी मोहोर किंवा स्टीकर आणि मोहोरबंद करण्यासाठी आणि पडताळणीचा ठसा उमटविण्यासाठी आवश्यक असतील अशी अन्य इतर उपकरणेही पुरविण्यात येतील. असे साचे, ठसे, कागदी मोहोर किंवा स्टीकर आणि अन्य उपकरणांची रचना व त्यांची संख्या नियंत्रकाने मंजूर केल्याप्रमाणे असेल.

(३) प्रत्येक वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याला शिक्का रद्द करण्यासाठी खाली दाखविल्याप्रमाणे अष्टकोनी ताऱ्याच्या योग्य आकाराचे साचे पुरविण्यात येतील. ✷

**२१. वजन वा माप इत्यादींच्या वापरासंबंधी तरतुदी**

(१) कोणत्याही व्यवहारांमध्ये दांडीचा तराजू वापरत असेल अशी प्रत्येक व्यक्ती तिच्या जागेत हा तराजू स्टँडला किंवा साखळीला आकड्याने टांगून ठेवील ;

परंतु हा पोट-नियम फिरत्या विक्रेत्यांना लागू असणार नाही.

(२) प्रत्येक वजन वा माप यांचा स्वच्छ अवस्थेत आणि योग्य त्या प्रकाश व्यवस्थेत वापर करावा. आणखी, तोलन उपकरण अशा प्रकारे ठेवावे की, ग्राहकांना वजन करण्याची प्रक्रिया स्पष्टपणे दिसेल.

(३) त्यांच्या मूळ जागेवर पडताळणी, मुद्रांकन आणि मोहरबंद करण्यात आलेल्या कोणत्याही वजन वा मापाचे भाग नियंत्रक किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेली अन्य व्यक्ती यांना पूर्व सूचना दिल्याशिवाय, सुटे करण्यात येणार नाहीत किंवा त्यांच्या मूळ जागेवरुन ते हलविण्यात येणार नाहीत.

(४) तोलन उपकरणाच्या अचूकपणाची खात्री व्हावी यासाठी उपयोगकर्ता, प्रत्येक तोलन उपकरणांच्या ठिकाणी उपकरणाच्या क्षमतेच्या एक दशांश पट किंवा एक हजार किलोग्रॅम यापैकी जे कमी असेल त्या क्षमतेची यथोचितरीत्या पडताळणी व मुद्रांकन केलेली वजने ठेवील. उपयोगकर्ता तोलन उपकरण वजन करण्यासाठी योग्य असल्याची खात्री करण्यासाठी या वजनाद्वारे दररोज तपासणी करेल. अनुज्ञेय मर्यादेहून अधिक अशी कोणतीही त्रुटी आढळली तर अशा बाबतीत उपयोगकर्ता अशा तोलन उपकरणाचा वापर थांबवील; आणि संबंधित वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याला त्याची फेर-पडताळणी करण्यासाठी सूचित करील;





परंतु, व्यवसायाच्या जागी तोलन उपकरणांची संख्या एकाहून अधिक असेल अशा ठिकाणी पडताळणी व मुद्रांकन केलेल्या वजनांची एकूण संख्या नियंत्रकानी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

(५) प्रत्येक पेट्रोल/डिझेल पंपाच्या योग्य वितरणाची खात्री करण्यासाठी त्या पंपाचा वितरक स्वतःच्या जागेत पडताळणी केलेले ५ लिटर किंवा १० लिटर क्षमतेचे माप ठेवील आणि पंपाद्वारे अचूक वितरण होत असल्याची खात्री करून घेण्यासाठी प्रत्येक दिवशी पंपातून देण्यात येणाऱ्या पेट्रोल/डिझेलची तपासणी करील. पंपाद्वारे कमी वितरण होत असल्याचे आढळल्यास वितरक अशा पंपाद्वारे वितरण करण्याचे तात्काळ थांबवील आणि पंपाच्या फेर-पडताळणीबाबत संबंधित वैधमापनशास्त्र अधिकाऱ्याला कळवील.

(६) ग्राहकाला, पोट-नियम (४) व (५) मध्ये निर्देशिलेल्या वजन व मापाने, वजन वा मापाची अचूकता ताडून पाहण्याचा हक्क असेल.

**२२. पडताळणी प्रमाणपत्र प्रदर्शित करणे.**— जिला पडताळणी प्रमाणपत्र देण्यात आलेले असेल अशी व्यक्ती ते प्रमाणपत्र ज्यांच्याशी हे प्रमाणपत्र संबंधित आहे अशी वजने, मापे किंवा, तोलन वा मापन उपकरणे ज्या जागेत वापरली जात असतील, त्या जागेत ठळक ठिकाणी प्रदर्शित करील;

परंतु फिरत्या विक्रेत्यांच्या बाबतीत असे प्रमाणपत्र त्या व्यक्तीकडेच ठेवण्यात येईल :

परंतु आणखी असे की, वाहन टाकीच्या बाबतीत पडताळणी प्रमाणपत्र त्या वाहनाबरोबर ठेवण्यात येईल.

**२३. नियमांचे उल्लंघन करण्याबाबत शास्ती.**— ज्यांचे उल्लंघन करण्यासंबंधात अधिनियमात कोणतीही वेगळी तरतूद करण्यात आलेली नाही अशा या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील अशा कोणत्याही व्यक्तीस पाच हजार रुपयापर्यंत दंड असू शकेल इतकी शिक्षा करण्यात येईल.

**२४. अपिलाचा नमुना**

(१) अधिनियमान्वये आणि या नियमान्वये करावयाचे प्रत्येक अपील, अनुसूची १३ मध्ये नमूद केलेल्या नमुन्यात दाखल करण्यात येईल आणि ज्या आदेशाच्याविरुध्द अपील केलेले असेल त्या आदेशाची प्रत त्यासोबत जोडण्यात येईल.

(२) राज्य शासनाकडे अपील करताना अपिलासोबत रु.५००.०० इतकी फी आणि नियंत्रकाकडे अपील करताना रु.२००.०० इतकी फी एकतर दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे, किंवा यथास्थिति उक्त मुल्याचा न्यायालय फी मुद्रांक जोडण्यात येईल.

**२५. अपराध सामोपचाराने मिटवण्यासाठी फी.**— अधिनियमाखाली आणि या नियमाखाली घडलेला अपराध सामोपचाराने मिटवण्यासाठीची फी, अनुसूची १४ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार असेल.

## अनुसूची एक

(नियम ५ पहा)

खालील विक्रेय वस्तू, त्यांच्यासमोर दर्शविण्यात आल्यानुसार वजनाने, मापाने किंवा संख्येने विकता येतील :-

**तक्ता**

| अनुक्रमांक | विक्रेय वस्तू | | प्रतिज्ञापन हे वजनानुसार, मापानुसार किंवा संख्येनुसारअथवा यापैकी दोन किंवा अधिक प्रकारे दर्शविण्यात यावे किंवा कसे. |
|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) |
| १ | एरोसोल उत्पादने | .. | वजन |
| २ | द्रवरूप आम्ले | .. | वजन किंवा घनफळ |
| ३ | संपिडीत किंवा द्रविकृत गॅस (द्रविकृत पेट्रोलियम गॅसचा समावेश यात होत नाही) | .. | वजन व तत्सम नमूद केलेल्या तापमानात व दाबात असलेले घनफळ. |
| ४ | लोणी (पीनट बटर,चीज, दही,तूप यांचा समावेश) | .. | वजन |
| ५ | विद्युत केबल | .. | लांबी किंवा वजन |
| ६ | विद्युत तार | .. | लांबी किंवा वजन |
| ७ | कुंपण तार | .. | लांबी किंवा वजन |
| ८ | सुगंधित नसलेले केश तेल | .. | वजन किंवा घनफळ |
| ९ | फळे व भाजीपाला | .. | संख्या किंवा वजन |
| १० | फर्नेस ऑईल | .. | वजन किंवा घनफळ |
| ११ | जवसाचे तेल व इतर वनस्पती तेले | .. | वजन किंवा घनफळ |
| १२ | जड अवशेष इंधनतेल | .. | वजन |
| १३ | औद्योगिक डिझेल इंधन | .. | घनफळ |
| १४ | मध, माल्ट एक्स्ट्रॅक्ट, गोल्डन सिरपट्रिकल्स. | .. | वजन |
| १५ | आईस्क्रीम व इतर तत्सम गोठवलेली उत्पादने | .. | वजन किंवा घनफळ |
| १६ | द्रवरूप रसायने | .. | वजन किंवा घनफळ |
| १७ | द्रवरूप पेट्रोलियम गॅस | .. | वजन |
| १८ | खिळे, लाकडी स्क्रू | .. | संख्या किंवा वजन |





| (१) | | | (२) | (३) |
|---|---|---|---|---|
| १९ | रंग (पेस्ट रंग किंवा घन रंग याव्यतिरिक्त), व्हार्निश व व्हार्निश स्टेन्स, एनॅमल्स. | .. | घनफळ | |
| २० | पापड | .. | संख्या व वजन | |
| २१ | पेस्ट रंग, घन रंग | .. | वजन | |
| २२ | रसगुल्ला, गुलाबजाम व इतर गोड पदार्थ | .. | वजन | |
| २३ | तयार कपडे | .. | संख्या व माप | |
| २४ | सर्व प्रकारचे सॉस | .. | वजन | |
| २५ | टायर्स व ट्युब्ज | .. | संख्या | |
| २६ | सूत | .. | वजन किंवा सुताची लांबी. | |
| २७ | संपिडीत नैसर्गिक वायू (सीएनजी) | .. | वजन | |
| २८ | द्रवरूप पेट्रोलियम वायू (एलपीजी) | .. | वजन | |
| २९ | द्रवरूप नैसर्गिकवायू (एलएनजी) | .. | वजन | |

मालक/व्यवस्थापकीय
भागीदार/व्यवस्थापकीय
संचालक यांचे स्वसाक्षांकित
छायाचित्र चिकटवावे

## अनुसूची दोन (क)

नमुना एलएम-१

**वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम ६(१) अन्वये वजन वा माप यांचे उत्पादक म्हणून लायसनसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना**

प्रति,

| तपशील (१) | अर्जदाराने भरावयाचे (२) | तपासणी अधिकाऱ्याची टिप्पणी (३) |
|---|---|---|
| १ जिच्यासाठी लायसन पाहिजे असेल त्या उत्पादक संस्थेचे नाव | | |
| २ संबंधित संस्थेचा पूर्ण पत्ता | | |
| ३ वास्तू मालकीची/भाड्याची/भाडेपट्टीने घेतलेली/संमती-नि-परवानगीची आहे किंवा कसे ? (पुष्टीदाखल दस्तऐवज जोडावेत) | | |
| ४ संबंधित संस्थेच्या स्थापनेचा दिनांक | | |
| ५ मालक/भागीदार/मर्यादित कंपनीच्या बाबतीत व्यवस्थापकीय संचालक किंवा संचालक यांचे/यांची त्यांच्या वडील / पतीच्या नावासहित नावे/ व पत्ता/पत्ते | | |
| ६ कारखाना अधिनियम/दुकाने व आस्थापना अधिनियम, महानगरपालिका व्यापारी लायसन याअन्वयेचा लायसन नोंदणी क्रमांक व दिनांक. | | |
| ७ सध्या करीत असलेल्या व्यवसायाचे स्वरूप | | |
| ८ नियोजित उत्पादन करावयाच्या वजन वा माप यांचे प्रकार | | |
| ९ काम करणाऱ्या / काम करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या कामगारांची संख्या<br>(एक) कुशल<br>(दोन) अर्ध-कुशल<br>(तीन) अकुशल<br>(चार) या विषयातील विशेषज्ञ. | | |
| १० अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांची नावे व त्यांची शैक्षणिक अर्हता | | |
| ११ वजन वा माप यावर काही आद्याक्षर मुद्रा किंवा बोधचिन्ह उमटवावयाचे असल्यास, त्याची माहिती. | | |



| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १२ वजन वा माप इत्यादींच्या उत्पादनासाठी उपलब्ध असलेली यंत्रसामग्री, अवजारे व उपसाधने यांच्यासंबंधी तपशील | | |
| १३ उपलब्ध असलेल्या ओतशाळा/कार्यशाळा इत्यादी मग ती स्वतःच्या मालकीची किंवा दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टीवर असेल, त्याचा तपशील. | | |
| १४ महत्त्वाच्या सुट्या भागाचे किंवा अन्य साधनांची काठिण्य चाचणी घेण्याच्या तसेच पोलाद ओतकामाविषयक सोयी. | | |
| १५ वीजपुरवठ्याची उपलब्धता | | |
| १६ आपणांस शासनाकडून किंवा वित्तीय संस्थेकडून काही कर्ज मिळाले आहे काय असल्यास, त्यासंबंधी तपशील द्यावा. | | |
| १७ बँकर्स असल्यास त्यांची नावे | | |
| १८ मूल्यवर्धित कर/विक्रीकर नोंदणी क्रमांक सीएसटी क्रमांक/व्यवसाय कर नोंदणी क्रमांक/आयकर क्रमांक. | | |
